फिर्याद नि.क्र.०१ (१) संक्षिप्त खटला क्रमांक ६४७/२०१७
सार्थक जाधव विरुद्ध मेसर्स मोरया इन्फ्रा. कंस्ट्रक्शन

**<u>फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम २००</u>**
**<u>नुसार फिर्यादीची शपथेवर तपासणी</u>**

मी शपथपुर्वक निवेदन करतो की :
माझे नाव सार्थक जाधव. वडीलांचे अनंत जाधव.
वय : ३३ वर्षे, धंदा : काही नाही.
राहणार : मुक्काम रोहा दिवाणी न्यायालयासमोर,
दमखाडी, तालुका रोहा, जिल्हा रायगड.

<u>फिर्यादीतर्फे विधीज्ञ श्रीमती एस्. बी. गुंड हजर</u> :-

**०१.** मला दिनांक २४.०४.२०१७ रोजी मोरया कंस्ट्रक्शनचे मुख्याधिकारी गणेश परब यांनी मॅरेथॉन इनोव्हा, मुंबई येथे त्यांच्या कार्यालयात बोलावले होते. माझी तेथे मुलाखत घेतली आणि मला सेल्स मॅनेजर म्हणून निवड करुन मला अपेक्षीत पगार विचारला. मला त्यांनी सांगीतले की, आम्ही जास्तीत-जास्त रक्कम रुपये १२,०००/- पगार देवू शकतो तसेच रक्कम रुपये ३५०/- टेलीफोन भत्ता आणि प्रवास भत्ता जेवढा होईल तेवढा देवू शकतो.

**०२.** मी दिनांक २५.०४.२०१७ रोजी मोरया होम टाउन नागोठणे येथे हजर झालो. मी एक महिना झाल्यावर गणेश परबकडे पगाराची मागणी केली. मला त्याने सांगीतले की, पुढच्या महिन्यात पगार देवू. मी दुस-या महिन्यात पगार जमा करा अशी मागणी केली. मला गणेश परबने पगार देवू असे सांगीतले. मी दिनांक २४.०६.२०१७ रोजी शेवटी कंटाळून ई-मेलद्वारे रीतसर राजीनामा पाठवला.

**०३.** मी त्यानंतर पगारासाठी फोन व ई-मेल केले. मला त्यांनी पगार पुढच्या महिन्यात देवू, नंतर देवू असे सांगीतले, हा प्रकार तीन महिने चालू होता. मी त्यांच्या त्रासाला कंटाळून समाज हितासाठी फेसबुकवर एक पोस्ट तयार केली की, रोहा तालुक्यात बिल्डींग साईटवर कोणाला जॉबची ऑफर आल्यास जॉब करु नका, कारण त्यांच्याकडे मला पगार देण्यासाठी पैसे नाहीत. मला त्या मेसेजवर अनेक लाईक्स् व कमेंट्स आल्या तसेच फोन देखील आले. गणेश परबच्या अकाउंटवरुन मी पाठवलेल्या पोस्टवर कमेंट होती की, पोलीस ठाणे नागोठणे यांना त्यांनी दिलेल्या तक्रार अर्जाची प्रत जोडली होती.

**०४.** मला दिनांक ०४.०९.२०१७ रोजी रात्री ०१:३० ते ०२:०० वाजता गणेश परब फोन करत होते. मी झोपेत असल्यामुळे फोन उचलले नाहीत. मला वॉटसअप नंबर वर गणेश परबचा मेसेज आला की, फेसबुकवरची पोस्ट काढून टाक. गणेश परबने त्या मेसेजमध्ये लिहले होते की, तु कोणी मोठा माणूस नाहीस, मी पण गप्प आहे ईमानदारीत सांगतो, उद्या हेड ऑफीसला ये आणि पगार घेवून जा. गणेश परबची धमकावणारी भाषा असल्यामुळे मी त्याच्या ऑफीसमध्ये पगार आणण्यासाठी गेलो नाही.

**०५.** गणेश परबने जाहीर स्वरुपात माझ्या फोटोसह रायगड टाईम्स, पुढारी आणि सागर वृत्तपत्रात बातमी दिली की, या ईसमाने फसवणुक केली आहे, त्याच्याशी कोणतेही संबंध ठेवू नयेत. मी सामाजीक कार्य करत असल्यामुळे रोहा परिसरातील जनतेला मी ज्ञात आहे. मला त्यामुळे अनेकांनी फोन केले, गाठी-भेटी घेतल्या व त्या प्रकारावरुन हिणवू लागले. मला घराबाहेर पडताना सुद्धा अपमानास्पद वाटू लागले.

मला माझी तपासणी वाचून दाखवली. मी माझी तपासणी विधीज्ञांच्या हजेरीत वाचून पाहिली, बरोबर लिहले आहे, म्हणून मी खाली सही करतो.

---**स्वाक्षरी**---
फिर्यादीची सही व तारीख

माझे समक्ष

---**स्वाक्षरी**---

(सुभाष ल. फुले)
(एम एच आर जी ०००९ - २१२५)
प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी, रोहा.
दिनांक १८.०६.२०१८.